बन्सीलाल रामनाथ अगरवाल चॅरिटेबल ट्रस्ट संचलित
विश्वकर्मा इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी
(सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न स्वायत्त संस्था)
(पुर्वीचे पुणे विद्यापीठ)
६६६, अप्पर इंदिरानगर, बिबवेवाडी, पुणे - ४११ ०३७.
Approved by A. I. C. T. E. New Delhi

Bansilal Ramnath Agarwal Charitable Trust's
Vishwakarma Institute of Technology
An Autonomous Institute Affiliated to Savitribai Phule Pune University
(Formerly University of Pune)
666, Upper Indiranagar, Bibwewadi, Pune - 411 037.
Identification No. - PU/PN/Engg./061/(1984)

नोटीस क्र. 285 नोटीस दि.०८/१०/२०२५

## पंडीत दीनदयाळ उपाध्यायय स्वयंम योजना २०२५-२६ करिता ऑनलाईन अर्ज सादर करणेबाबत
## (योजना फक्त अनुसूचित जमाती (ST) प्रवर्गासाठी लागू)

महाविद्यालयामध्ये शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये ज्या विद्यार्थ्यांचा प्रवेश अनुसूचित जमाती (ST) या प्रवर्गातून प्रथम/व्दितीय/तृतीय तसेच चतुर्थ वर्ष बी.टेक मध्ये झालेला तसेच ज्या विद्यार्थ्यांचे पालकांचे वार्षिक उत्पन्न रूपये २,५०,०००/- चे आत आहे तसेच जे विद्यार्थी हे बाहेर गावाहून पुणे येथे शिक्षणासाठी आलेले आहेत अशा विद्यार्थ्यांना निर्वाहभत्ता (हॉस्टेल मेंटेनन्स ) रक्कम मंजूरी करिता शासनातर्फे **https://swayam.mahaonline.gov.in** या वेबसाईटवरून ऑलनाईन अर्ज भरून त्याची एक प्रत आणि कागदपत्रे महाविद्यालयात दि. ३० /१०/ २०२५ पूर्वी जमा करावीत. तरी जे विद्यार्थी खालील अटी व शर्तीची पूर्तता करू शकतात त्यांनीच पंडीत दीनदयाळ उपाध्यायय स्वयंम योजना करिता फक्त ऑनलाईन अर्ज करावेत.

-: पंडीत दीनदयाळ उपाध्यायय स्वयंम योजनेच्या अटी व शर्ती यांचा तपशील खालील प्रमाणे:-

- विद्यार्थी **ST** प्रवर्गाचा असवा, व त्याचेकडे अनुसूचित जमातीचा दाखला व जात वैधता प्रमाणपत्र असणे अनिवार्य आहे.
- विद्यार्थ्यांने शासनाच्या **https://swayam.mahaonline.gov.in** वेबसाईटवरून नवीन/नुतनीकरणाचा अर्ज सादर केला पाहिजे.
- विद्यार्थी बाहेर गावाहून पुणे येथे शिक्षणासाठी वास्तव्यास असावा. पुणे शहर स्थित विद्यार्थ्यांना योजना लागू नाही.
- विद्यार्थ्याने शासकीय वसतिगृहामध्ये प्रवेश मिळणेकरिता अर्ज केलेला असावा.
- विद्यार्थ्यास शासकीय वसतिगृह न मिळाल्याबाबत प्रमाणपत्र सादर करावे.
- विद्यार्थ्याचे व पालकांचे विहित नमुन्यातील प्रतिज्ञापत्र सादर करावे.
- विद्यार्थी हा महाविद्यालयाचे वसतिगृहातील प्रवेशित नसल्यास ज्या ठिकाणी विद्यार्थी राहत आहे त्या घरमालकाने लिहून दिलेला करारनामा अथवा प्रायव्हेट हॉस्टेलमध्ये राहत असल्यास त्यांचे हॉस्टेलचे सर्टिफिकेट व फी भरल्याची पावती.
- भाडे करारनामा असल्यास त्यामध्ये स्पष्टपणे कालावधी नमूद असावा तसेच दरमहा भरत असलेली रक्कम नमूद असावी तसेच करारनाम्यामध्ये विद्यार्थी ज्या व्यक्तींकडे राहत आहे त्यांची सही, अंगठा व फोटो असणे अनिवार्य आहे.
- कागदपत्रे - १०वी / १२ वी उत्तीर्ण मार्कशिट, पालकाचा उत्पन्न दाखला, महाराष्ट्राचे अधिवास प्रमाणपत्र, शाळा सोडल्याचा दाखला, भाडे करारनामा किंवा हॉस्टेल सर्टिफिकेट तसेच महाविदयालयाव्दारे दिलेले उपस्थिती प्रमाणपत्र (अटेन्डन्स् सर्टिफिकेट)२०२५-२६.
- नुतनीकरणाचे विद्यार्थ्यांनी मागील वर्ष प्रथम/व्दितीय/तृतीय/चतुर्थ वर्ष बी.टेक च्या मार्कशिटस्.
- महाविद्यालयाची शैक्षणिक वर्ष २०२५-२६ ची फी भरल्याची रिसिप्ट.
- सदर स्वयंम योजनेचा ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर त्याची प्रत महाविद्यालयात योग्य त्या कागदपत्रासह महाविद्यालयात तपासणीसाठी सादर करावेत. असा अर्ज प्राप्त झालेनंतरच विद्यार्थ्यांच्या ऑनलाईन अर्जास मंजूरी दिली जाईल याची सर्व विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.
- जे विद्यार्थी कागदपत्रे व ऑनलाईन अर्ज सादर करणार नाहीत अशा विद्यार्थ्यांचे अर्जास मंजूरी दिली जाणार नाही याची सर्व संबंधित विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.
- विद्यार्थ्याने बनावट व खोटी कागदपत्रे सादर करून शासनाच्या योजनाचा लाभ घेतल्याचे निदर्शनास आल्यास अशा विद्यार्थ्यांस मंजूर झालेली सर्व रक्कम जमा करणे बंधनकारक राहील याची संबंधित विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

B.R.A.C. TRUST
विश्वकर्मा इन्स्टिट्यूट पुणे-३७.
Vishwakarma Institute of Technology

संचालक
विश्वकर्मा इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी,
पुणे-४११०३७

प्रत: १) सर्व विभाग प्रमुखांना माहितीसाठी, २) सर्व नोटीसबोर्डकरिता, ३) सिस्टीम विभाग प्रमुख यांना माहितीकरिता व विभागाचे नोटीस बोर्डकरिता प्रकाशित करणेकामी.